Peer Reviewed Refereed and
UGC Listed Journal
(Journal No. 47100)


ISSN - 2279 - 0489

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL

GENIUS

Volume - XI, Issue - II
February - July - 2023
Marathi Part - I

IMPACT FACTOR / INDEXING
2020 - 6.538
www.sjifactor.com



Ajanta
Prakashan

ISSN - 2279 - 0489

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL

GENIUS

Volume - XI Issue - II February - July - 2023

Marathi Part - I

Peer Reviewed Refereed and UGC Listed Journal No. 47100

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2020 - 6.538
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖
Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

VOLUME - XI, ISSUE - I - AUGUST - JANUARY - 2022-23
GENIUS - ISSN 2279 - 0489 - IMPACT FACTOR - 6.538 (www.sjifactor.com)

CONTENTS OF MARATHI PART - I

अ.क्र.	लेख आणि लेखकाचे नाव	पृष्ठ क्र.
१	स्त्री उद्धारासाठी पंडिता रमाबाई यांचे 'मुक्तीमिशन' संस्थेतील योगदान **सौ. आदिती आशुतोष कुलकर्णी**	१-७
२	अनाथ बालिकाश्रमाचे स्त्री सुधारणा चळवळीतील योगदान **प्रा. डॉ. बोत्रे अमोल पोपट**	८-१०
३	पंडिता रमाबाई यांचे सामाजिक व साहित्यिक कार्य **डॉ. अनुराधा वसंत गुजर**	११-१४
४	पंडिता रमाबाई यांचे सामाजिक सुधारणेतील योगदान **अर्चना राजेंद्र गायकवाड**	१५-२१
५	स्वातंत्र्य संग्रामातील विरांगणा **प्रा. डॉ. सौ. अरुणा रविंद्र वाघोले**	२२-२८
६	पंडिता रमाबाई यांचे कार्य आणि समकालीन स्त्री शिक्षण स्थिती **डॉ. भाऊसाहेब दादासाहेब गव्हाणे**	२९-३१
७	महाराष्ट्राची तेजस्विनी पंडिता रमाबाई यांचे शारदा सदनातील कार्य : एक अभ्यास **डॉ. पौळ भावना श्रीपती**	३२-४१
८	एकोणिसाव्या शतकातील स्त्रीवादी चळवळीत पंडिता रमाबाई यांचे योगदान **प्रा. डॉ. चांगुणा विठ्ठल कदम**	४२-४६
९	पंडिता रमाबाई यांचे सामाजिक व शैक्षणिक कार्यांचा आधुनिक भारतावर पडलेला प्रभाव **डॉ. देवेंद्र रमेशराव भगत**	४७-५०
१०	स्त्री उद्धारक पंडिता रमाबाई **डॉ. के. एस. खैरनार**	५१-५३
११	पंडित रमाबाईचे सामाजिक क्षेत्रातील योगदान : एक ऐतिहासिक अवलोकन **डॉ. अंबादास मंजुळकर**	५४-५७
१२	पंडिता रमाबाई यांचे सामाजिक कार्य **प्रा. डॉ. बाळासाहेब नानासाहेब देवकाते**	५८-६३
१३	महात्मा जोतिबा फुले यांचे सामाजिक, ऐतिहासिक कार्य राष्ट्रउभारणीस प्रेरक **प्रा. डी. जी. कापुरे**	६४-६८

CONTENTS OF MARATHI PART - I

अ.क्र.	लेख आणि लेखकाचे नाव	पृष्ठ क्र.
१४	पंडिता रमाबाईंचा विवाह व त्यांची वैशिष्ट्ये **डॉ. कान्हु लक्ष्मण गिरमकर**	६१-७१
१५	पंडिता रमाबाई यांचे दुष्काळातील कार्य **प्रा. डॉ. रघुराज एम्. कुरुमकर**	७२-७५
१६	Contribution of Pandita Ramabai In Social Reformation **Dr. Ladaf S. K.**	७६-७९
१७	महाराष्ट्रातील समाज सुधारणेमध्ये पंडिता रमाबाई यांचे योगदान **प्रा. डॉ. महेश वाघ**	८०-८५
१८	पंडिता रमाबाईचे महिला मुक्ती करिता कार्य **प्रा. डॉ. मंगला पी. कटरे**	८६-९१
१९	पंडीता रमाबाईचे स्त्री मुक्ती चळवळीतील योगदान **डॉ. किशन केंद्रे**	९२-९५
२०	पंडिता रमाबाई यांच्या केडगाव 'मुक्ती मिशन' मधील व्यवस्थापकीय विभागांचा अभ्यास **डॉ. मनीषा सयाजी सोडनवर**	९६-१०२
२१	पंडिता रमाबाई यांचे स्त्रीविषयक कार्य **डॉ. मीना चंद्रभान साळे**	१०३-१०६
२२	पंडिता रमाबाई कार्य **प्रा. डॉ. मोकाटे नाथा रामभाऊ**	१०७-११२
२३	पं. रमाबाई व शारदा सनदनाच्या कार्याचा चिकित्सक अभ्यास (सन १८८९ ते सन १८९८) **श्री. प्रणय नंदकुमार जाधव** **डॉ. सुनिता ज्ञानदेव बनकर** **प्रा. विकास दत्तात्रय धुमाळ**	११३-११७
२४	परदेशी परिषदांमधील पंडिता रमाबाईंचे योगदान **कु. राजश्री संतोष ढेंबे**	११८-१२१
२५	पंडिता रमाबाई यांची स्त्रीविषयक सामाजिक कार्य **प्रा. डॉ. रवी सोरते**	१२२-१२५

CONTENTS OF MARATHI PART - I

अ.क्र.	लेख आणि लेखकाचे नाव	पृष्ठ क्र.
२६	१९ व्या शतकातील स्त्रियांचे सामाजिक जीवन विशेष संदर्भ गो. ग. आगरकर यांचे स्त्री जीवन विषयक कार्य **प्रा. संगीता बाबुराव चव्हाणके**	१२६-१२९
२७	पंडिता रमाबाई यांचे जीवन व कार्य **Dr. Waghmare Sanjay Tukaram**	१३०-१३४
२८	पंडिता रमाबाईंची जडणघडण व संमतिवय विधेयक **डॉ. शोभा बबन वाईकर**	१३५-१३८
२९	पंडिता रमाबाई यांच्या पुरोगामी विचारांचे योगदान **सुभाष लक्ष्मन अहिरे**	१३९-१४३
३०	समाजसुधारणेतील पंडित रमाबाई यांचे योगदान **श्री. सुदर्शन रघुनाथ गोळे**	१४४-१४९

८. एकोणिसाव्या शतकातील स्त्रीवादी चळवळीत पंडिता रमाबाई यांचे योगदान

प्रा. डॉ. चांगुणा विठ्ठल कदम
इतिहास विभाग, बी. डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव, तालुका-आंबेगाव. जिल्हा-पुणे.

प्रास्ताविक

एकोणिसावे शतक हे स्त्री सुधारणांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे शतक ठरले. कारण या काळात धार्मिक, सामाजिक व राजकीय प्रबोधनाला सुरुवात झाली. भारतात झालेल्या सर्व सुधारणावादी व पुनरुज्जीवनवादी चळवळी या प्रामुख्याने स्त्री प्रश्नाभोवतीच गुंतल्या होत्या. युरोपमध्ये फ्रेंच राज्यक्रांतीच्या सुमारास स्त्रीवादी जागृतीची व चळवळीची लाट वेगाने पसरली.युरोपप्रमाणे भारतातही स्त्री स्वातंत्र्याची चर्चा घडून आली.आधुनिक भारतातील स्त्रीवादी चळवळीचा इतिहास चार दशके मागे पहावा लागतो.ब्रिटिशांच्या आगमनानंतर भारतात वसाहतवाद मूळ धरु लागला. वसाहतकाळापासूनच्या महाराष्ट्राच्या इतिहासावर नजर टाकली तरी महाराष्ट्राचा इतिहास हा प्राधान्याने सामाजिक चळवळींचाच इतिहास असलेला दिसून येतो.या दृष्टीने पाहता त्या काळातील महत्त्वाच्या चळवळी म्हणून स्त्रियांच्या चळवळी, शेतकरी चळवळी, दलित बहुजनांच्या चळवळी, मुस्लिम समाजातील चळवळी, आदिवासी चळवळी या काही महत्त्वाच्या चळवळींचा निर्देश करावा लागतो.

एकोणिसाव्या शतकातील स्त्रीवादी चळवळ

प्रत्येक सामाजिक चळवळींना जसा सुसंगत इतिहास असतो, तसा इतिहास हा स्त्रीवादी चळवळींनाही लाभलेला दिसून येतो. १७८९ मधील फ्रेंच राज्यक्रांतीतून स्त्रीमुक्ती विचारांना निश्चित दिशा मिळाली. स्वातंत्र्य, समता, बंधुता ही तीन तत्वे फ्रेंच राज्यक्रांतीने जगाला दिली. यातूनच स्त्रीवर्गालाही जाग आली. याच पातळीवर स्त्रीवादी चळवळी उभ्या आहेत. थोडक्यात स्त्रीवादी चळवळ म्हणजे, "अनेक छटा असलेल्या बहुविध संघटना, व्यक्ती, कल्पना यामधून व्यक्त होणाऱ्या स्त्रियांच्या बदलत्या भूमिकांशी निगडित असणारी सामाजिक चळवळ. यामध्ये मवाळ सुधारणावादी दृष्टिकोनापासून समाजात सर्वांगीण बदलापर्यंत विविध भूमिका असणाऱ्या सर्वांचा समावेश होतो. या सर्वांमध्ये दिसणारा एक समान दृष्टिकोन म्हणजे स्वतःची जीवनपद्धती आणि व्यवसाय निवडण्यामध्ये स्त्रियांना पूर्ण स्वातंत्र्य असले पाहिजे."[१]

एकोणिसाव्या शतकातील चळवळी या स्त्रियांना काही हक्क मिळाले पाहिजे या प्रश्नाभोवती उभारल्या गेल्या होत्या. काही पुरुष समाजसुधारक व जागरुक स्त्रिया यांच्या अनुकंपेवर आधारित स्त्री दास्य विमोचनाच्या व पुनरुज्जीवनवादी चळवळी पूर्ण शतकभर चालू होत्या. ब्रिटिश कालखंडात शिक्षणाला महत्त्व प्राप्त झाल्याने पाश्चात्य स्त्रियांच्या तुलनेत भारतीय स्त्रिया अडाणी ठरल्या होत्या. अशा स्त्रियांना जागृत करण्यासाठी सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे, पंडिता रमाबाई, रमाबाई रानडे, डॉ. आनंदीबाई जोशी इत्यादी महाराष्ट्रातील स्त्रियांनी वेगवेगळ्या मार्गाने स्त्री वर्गात जागृती घडवून आणली होती. शाळा, महिलाश्रम, अनाथाश्रम यामुळे

स्त्रियांना व्यवसायिक शिक्षण मिळू लागले. त्यातून स्त्रियांच्या आर्थिक स्वावलंबनात वाढ घडून आली. प्रस्तुत शोधनिबंधात एकोणिसाव्या शतकातील स्त्रीवादी चळवळीत पंडिता रमाबाई यांच्या योगदानाचे विस्तृत विवेचन केलेले आहे.

शोध निबंधाची उद्दिष्टे

१. एकोणिसाव्या शतकातील स्त्री जीवनाचा संक्षिप्त आढावा घेणे.

२. एकोणिसाव्या शतकातील स्त्रीवादी चळवळीची पार्श्वभूमी विशद करणे.

३. एकोणिसाव्या शतकातील स्त्रीवादी चळवळीतील पंडिता रमाबाई यांचे योगदान अभ्यासणे.

शोधनिबंधाची गृहीतके

१. एकोणिसाव्या शतकातील स्त्री जीवनावर विविध अनिष्ट रूढी, प्रथा, परंपरांचा पगडा होता.

२. एकोणिसाव्या शतकात समाजसुधारक व आत्मभान जागे झालेल्या महिला समाजसुधारकांच्या प्रयत्नातून स्त्रीवादी चळवळीची पायाभरणी झाली.

३. एकोणिसाव्या शतकातील स्त्रीवादी चळवळीत पंडिता रमाबाई यांनी मोलाचे योगदान दिले.

संशोधन पद्धती

प्रस्तुत शोधनिबंधासाठी ऐतिहासिक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे.

पंडिता रमाबाई यांचा अल्प परिचय

पंडिता रमाबाई यांचा जन्म २३ एप्रिल १८५८ रोजी कर्नाटकातील गंगामूळ येथे एका चित्पावन ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव अनंतशास्त्री डोंगरे व आईचे नाव लक्ष्मीबाई असे होते. अनंतशास्त्री डोंगरे हे वेदशास्त्र पारंगत होते. तसेच संस्कृत भाषेचे गाढे व्यासंगी होते. अनंतशास्त्रींनी आपल्या दोन मुलांना व पत्नीलाही संस्कृत शिकवले होते. आई-वडिलांच्या मार्गदर्शनाखाली रमाबाईंनी अगदी लहान वयातच अनेक विद्या आत्मसात केल्या. त्यांची बुद्धी जात्याच तल्लख असल्यामुळे त्यांनी अनेक ग्रंथ मुखोदगत केले होते. त्या संस्कृत भाषेतही पारंगत होत्या. वेद व इतर हिंदू धर्मग्रंथ यांवरही त्यांनी प्रभुत्व मिळवले होते. आई वडिलांच्या मृत्यूनंतर पंडिता रमाबाई व त्यांचे बंधू श्रीनिवास यांनी आपला मुलुख सोडून ते तीर्थयात्रेस निघाले. पुढे सुमारे सहा वर्षे त्यांनी संपूर्ण हिंदुस्थानभर संचार केला. असंख्य हालअपेष्टांना सामोरे जात १८७८ मध्ये पंडिता रमाबाई कलकत्ता येथे येऊन पोहोचल्या. कलकत्ता येथील वास्तव्यातच रमाबाईंना व्यापक प्रसिद्धी मिळाली. त्यांनी आपल्या पांडित्याने आणि संस्कृत भाषेच्या ज्ञानाने मोठमोठ्या विद्वान पंडितांना थक्क करून सोडले होते. कलकत्त्यातील विद्वत सभेने त्यांचा जाहीर सन्मान केला व त्यांना सरस्वती व पंडिता या पदव्यांनी गौरविले. त्या वेळेपासून त्या पंडिता रमाबाई म्हणून ओळखल्या जाऊ लागल्या.

एकोणिसाव्या शतकातील स्त्रीवादी चळवळीतील पंडिता रमाबाई यांचे योगदान

स्त्री शिक्षण विषयक संस्थात्मक कार्य

पंडिता रमाबाई यांनी तत्कालीन समाजसुधारकांच्या सहाय्याने सेवासदन या संस्थेची ११ जुलै १९०८ रोजी प्रथम मुंबईत स्थापना केली. या संस्थेमार्फत स्त्रियांना शिक्षण देणे, त्यांच्या स्वावलंबनात वाढ करणे, स्त्रियांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे या हेतूने

प्रत्यक्ष कार्याला सुरुवात केलेली होती. नंतर १९०९ मध्ये पुणे येथे सेवासदन या संस्थेची शाखा स्थापन होऊन स्वतंत्रपणे कार्याला सुरुवात झालेली होती.

भारतातील शिक्षण पद्धतीत पुनर्रचना करण्याच्या वेळी सन १८८२ मध्ये मि. हंटर यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिशन नेमले होते. त्यावेळी कमिशन समोर साक्ष देताना त्यांनी सांगितले की, ह्या देशातील शेकडा नव्व्याण्णव लोक स्त्री शिक्षणाच्या व स्त्री प्रतिष्ठेच्या विरुद्ध आहेत. देशातील लोकसंख्या अर्धा हिस्सा स्त्रिया असून दुसऱ्या अर्ध्या हिस्स्याकडून त्यांच्यावर जुलूम केला जातो. म्हणून मुलींच्या शाळेत शिक्षिकाच नव्हे तर इन्स्पेक्टर पण स्त्रियाच हव्यात. उत्तम बोर्डिंग असलेल्या शाळांची मुलींसाठी जरुरी आहे. स्त्रियांना वैद्यकीय मदत पण अत्यंत आवश्यक आहे. पुरुष डॉक्टरांना त्या आपले दुखणे सांगण्याऐवजी मृत्यू पत्करतात. रमाबाईंची ही साक्ष पुण्यात त्यावेळी खूप गाजली. त्यातून स्त्री शिक्षणाच्या कार्याच्या दृष्टीने प्रेरणा मिळून मुलींसाठी शाळा सुरू झाल्या. १८८३ मध्ये रमाबाईंनी इंग्लंडमध्ये शिक्षक म्हणून प्रशिक्षण घेण्याचे ठरविले आणि इपीस्कोपालिअन चर्चमध्ये प्रवेश घेतला. १८८६ मध्ये चर्चच्या निमंत्रणावरून अमेरिकेत जाऊन तेथेच बालविधवांच्या शाळेला निधी पुरविणाऱ्या मंडळाची त्यांनी स्थापना केली. "स्त्रियांनी ज्ञान संपादन करून आपली उन्नती स्वतः करावी त्यामुळे परंपरा व धर्मांगत कर्मठता यांच्या ओझ्याखाली दबलेली भारतीय स्त्री ज्ञानी होईल, असे त्यांना वाटे."[२] अमेरिकेत ठिकठिकाणी व्याख्याने देऊन त्यांनी भारतीय स्त्रियांच्या शिक्षणासाठी निधी गोळा केला. तेथील मिशनऱ्यांनी देखील रमाबाईंना असे आश्वासन दिले की, "त्यांनी हिंदुस्थानात जाऊन स्त्री शिक्षणाचे कार्य हाती घेतल्यास आपण दहा वर्षापर्यंत त्या कार्याला आर्थिक सहाय्य देऊ."[३]

पंडिता रमाबाईंनी सर्व धर्मातील मुलींसाठी शारदा सदन या संस्थेची स्थापना केली होती. रमाबाई म्हणतात, 'माझ्या दाराशी येईल ती मुलगी माझी.' ती कोणतीही जातीची असो, तिच्या शिक्षणाची व पालनपोषणाची जबाबदारी मी घेईल. अशा प्रकारचे व्यापक धोरण स्त्री शिक्षणासंदर्भात त्यांनी आखलेले होते. पंडिता रमाबाईसंबंधी महर्षी अण्णासाहेब कर्वे आपल्या आत्मचरित्रात लिहितात, "महाराष्ट्रात विधवा शिक्षणाच्या इमारतीचा पाया घालण्याचे अत्यंत श्रेष्ठ कार्य पंडिता रमाबाई यांनी केले. त्यांनी विधवा शिक्षणाचे कार्य स्वतःच्या बळावर निर्माण केले. याबद्दल दक्षिणी समाजाने नेहमी कृतज्ञ राहायला पाहिजे. अशा या पराक्रमी स्त्रिया हिंदुस्थानात काय पण ह्या भूतलावरही हाताच्या बोटावर मोजण्याइतक्या सुद्धा मिळायच्या नाही."[४]

अशा प्रकारे पंडिता रमाबाईंनी शैक्षणिक कार्याच्या माध्यमातून स्त्रियांची प्रगती घडवून आणण्याचा प्रयत्न केला.

विधवांच्या स्थिती संदर्भात संस्थात्मक प्रयोग

विधवांच्या स्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी या समस्येचे निराकरण करण्यासाठी पंडिता रमाबाईंनी एप्रिल १८८९ मध्ये वसतिगृह आणि शाळा यांची एकत्रित सुरुवात शारदासदन संस्थेमार्फत केली. विधवांसाठी स्थापन केलेले महाराष्ट्रातील हे पहिलेच वसतिगृह होते. रमाबाईंनी ख्रिश्चन धर्म स्वीकारल्यामुळे त्यांच्या संस्थेकडे संशयाने पाहिले जाई. त्यामुळेच त्यांनी असे जाहीर केले की, ही शाळा ख्रिश्चन धर्माचा प्रसार किंवा धर्मांतर करण्याचा प्रयत्न करणार नाही. पण एका ख्रिश्चन साप्ताहिकाने डिसेंबर १८८९ मध्ये असा अहवाल सादर केला की शारदासदनातील सात विधवांपैकी दोघींनी ख्रिश्चन धर्माबद्दल वाटणारे प्रेम व्यक्त केले आहे. त्या काळातील पुनरुज्जीवनवादी वातावरणामध्ये या अहवालाने वादळ उठले. त्यांच्या धर्मांतराने लोकक्षोभ वाढला. रमाबाईंनी ख्रिस्ती धर्मप्रसार करू नये म्हणून अनेक निवेदने शारदासदनाच्या अमेरिकन पुरस्कर्त्यांकडे केली गेली पण त्याचा काही उपयोग झाला नाही.

त्यानंतर रमाबाईंनी शारदासदन पुण्यात हलविले. सुरुवातीला ३०० मुलींची सोय झाली. नंतर येथील मुलींची संख्या हजारापर्यंत पोहोचली. पुण्याजवळील केडगाव येथे त्यांनी मुक्ती सदनची स्थापना केली. या आश्रमात त्यांनी विविध उपयोग उद्योग सुरू केले. नर्सिंग, छापखाना, साड्या विणणे असे व दुग्धजन्य पदार्थ यांचे उत्पादन सुरू झाले. बालविधवांचे प्रश्न सोडविणे, समाजसुधारणा करणे या उद्दिष्टांसाठी त्या सतत झटत राहिल्या. विधवा स्त्रियांची स्थिती जाणून घेऊन त्यांना स्वतंत्रपणे जगता यावे या दृष्टीने शिक्षिका किंवा नर्सिंग सारखा व्यवसाय शिकवण्याची व्यवस्था केली जावी म्हणून रमाबाईंनी खूप खटपट केली. स्त्रियांचे आर्थिक स्वातंत्र्य म्हणजे स्त्री मुक्ती चळवळीची ही पहिली पायरी ठरली.

अंध स्त्रियांसाठी बार्तमी सदनाची स्थापना

इंग्लंड येथील सिस्टर ऑफ मर्सी या धर्तीवर चारित्र्यहीन स्त्रियांसाठी पंडिता रमाबाईंनी कृपा सदनाची स्थापना केली. तसेच वृद्ध अपंग व दुर्बल स्त्रियांसाठी प्रीती सदनाची स्थापना करून स्वतः रमाबाई त्यांची सेवा करीत असत. त्यांनी अंध स्त्रियांसाठी बार्तमी सदनाची स्थापना केली. त्यामध्ये अंधांना ब्रेल पद्धतीने शिकविले जात असे. या स्त्रियांना त्यांनी स्वेटर विणणे, वेताची खुर्ची विणणे, अशी कामे शिकवली. बार्तमी सदन ही भारतातील पहिली अंधशाळा होय.

व्याख्यानातून जनजागृतीचे कार्य

स्त्री सुधारणेच्या कार्याला चालना मिळण्याच्या दृष्टीने त्यांची व्याख्याने प्रभावी ठरलेली दिसून येतात. या व्याख्यानांतून त्यांनी स्त्री पुरुष समान हक्क व प्रतिष्ठा, स्त्रीशक्ती, स्त्री संघटना या आजच्या काळात दिसणाऱ्या संकल्पना शतकापूर्वी रमाबाईंनी निर्भीडपणे मांडलेल्या दिसतात. व्याख्यानातून प्रबोधनाचे कार्य करताना पुरुषांमध्येही जागृती व्हावी या दृष्टीने त्यांनी निमंत्रण पत्रिकेत, "आपल्या घरची एखादी स्त्री बरोबर आणणाऱ्या पुरुषालाच व्याख्यानाला प्रवेश दिला जाईल, अशी अट घातलेली होती."[५] ती काटेकोरपणे पाळली जात होती. त्यामुळे त्यांच्या भाषणामुळे पुण्याच्या सनातनी वातावरणात स्त्रीमुक्तीवादी विचार वाढीस लागण्यास मदत झालेली होती.

रमाबाईंनी मुक्ती सदनाच्या पाठोपाठ स्त्रियांसाठी कृपासदन सुरू केले. स्त्रीमुक्तीच्या दृष्टीने पंडिता रमाबाईंच्या शारदा सदनात घडलेला एक महत्त्वाचा समारंभ म्हणजे गोदुबाई जोशी हिचा विवाह. अशा या पुनर्विवाहाच्या प्रसंगामुळे विधवा विवाहातला आनंद, जातीभेद निर्मूलन, वैधव्य अपशकुनी नसल्याची भावना, विधवांचे रास्त हक्क अशा कितीतरी गोष्टी समाजासमोर ठेवल्या गेल्या. त्यामुळे समाजाचा त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन कसकसा बदलत गेला हे लक्षात येण्यास मदत होते. पंडिता रमाबाईंनी शारदासदन ही संस्था पुढे केडगावला सुरू केली. याबाबत प्र. के. अत्रे म्हणतात, "हिंदू मुलींना बाटविण्याचे कार्य पंडिता रमाबाईंनी अगदी मुक्त हस्ताने सुरू केले आहे."[६] परिणामी या संस्थेचे नाव बदलून मुक्तीसदन असे ठेवण्यात आले. हिंदू स्त्रियांचे अज्ञान, भोळ्या समजुती व बालविवाह या गोष्टींवर त्यांनी समाजामध्ये जागृती निर्माण करण्यासाठी 'उच्चवर्णीय हिंदू स्त्रिया'(High Cast Hindu Women) हा ग्रंथ लिहिला.

सारांश

आधुनिक भारताच्या इतिहासात स्त्री समाजसुधारकांमध्ये पंडिता रमाबाई यांचे कार्य अतिशय मोलाचे आहे. त्या काळात पती निधनाचे वैयक्तिक दुःख बाजूला सारून मोठ्या धैर्याने मुलींच्या व महिलांच्या शिक्षणासाठी अनेक संस्थांची त्यांनी उभारणी

केली. त्यांच्या राहण्याची व जेवणाची सोय केली. त्यांनी केलेले कार्य आजच्या महिलांसाठी दिशादर्शक व प्रेरणादायी आहे. पंडिता रमाबाईंनी त्या काळात स्त्री जागृतीचे केलेले कार्य अत्यंत मोलाचे समजले पाहिजे. एका स्त्रीने अतिशय प्रतिकूल परिस्थितीशी सामना देत हे कार्य यशस्वीपणे पार पाडले ही बाब निश्चितच कौतुकास्पद ठरते. त्या खऱ्या अर्थाने मानवतावादी होत्या. म्हणूनच विधवा, अनाथ व परित्यक्त्या स्त्रियांच्या उद्धारासाठी त्या पुढे आल्या. आपल्या आयुष्याच्या अखेरपर्यंत त्यांनी स्त्री उध्दाराच्या कार्याला वाहून घेतले. आपली बुद्धिमत्ता व कर्तबगारी यांच्या जोरावर त्यांनी अलौकिक कामगिरी करून दाखविली होती. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून ब्रिटिश सरकारने १९१९ मध्ये त्यांना कैसर ए हिंद ही पदवी बहाल केली होती.

संदर्भ व टिपा

१. दत्तात्रय पाष्टे, डायमंड सामाजिक ज्ञानकोश खंड-१, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथमावृत्ती,२०००,पृ.८२४.

२. पद्मजा पाटील, शोभना जाधव, भारतीय इतिहासातील स्त्रिया, फडके प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती २००७. पृ.१११.

३. दे.ना. टिळक, महाराष्ट्राची तेजस्विनी पंडिता रमाबाई, नागरिक प्रकाशन,१९६०,पृ.६६.

४. सरल धारणकर,आधुनिक भारतातील स्त्री जीवन, य.च.म.मु. विद्यापीठ, नाशिक, प्रथम प्रकाशन, २००४, पृ. ३३.

५. दत्तात्रय पाष्टे, iwoksZDr] पृ. ३३.

६. प्र. के. अत्रे, मराठी माणसे मराठी मने, प्रकाशक, सौ शुभदा विष्णू परचुरे, मुंबई, पृ.४७.

७. व्ही.एस. क्षीरसागर, महाराष्ट्रातील समाजसुधारक, के सागर प्रकाशन, पुणे, अठरावी आवृत्ती, २००७. पृ.१०८.

८. रा. शं वाळिंबे, एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्राची सामाजिक पुनर्घटना, प्रतिभा मुद्रणालय, पुणे, प्रथमावृत्ती, १९६२.

९. तर्क. लक्ष्मणशास्त्री जोशी, मराठी विश्वकोश खंड - १४, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९७६.

१०. स. मा. गर्गे भारतीय समाजविज्ञान कोश, खंड ३, समाजविज्ञान मंडळ, पुणे, १९८६.